**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**
**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक – ३२८/२०२२/नाशिक**

१ श्री. जितेश सुधन लाड : अपिलार्थी
रा. फ्लॅट नं. १२, मंडोले पार्क, चेतना नगर, राणेनगर,
नाशिक, ता.जि. नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
तलाठी,
तलाठी नाशिक शहर क्र. ४ यांचे कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नाशिक,
ता.जि. नाशिक.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा, : प्रतिवादी
मंडळ अधिकारी,
मंडळ अधिकारी यांचे कार्यालय,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, नाशिक,
ता.जि. नाशिक.

**सुनावणी दिनांक – २२/०६/२०२२**

अपिलार्थी यांनी दि. २१/१२/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे नमुद करुन माहिती नाकारली, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दि.२२/०६/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित**- सर्व पक्षकार उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दि. २५/१०/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये दिनांक ०१/०१/२०१४ ते दिनांक २१/१०/२०२१ या कालावधीतील मौजे नाशिक, तालुका जिल्हा नाशिक येथील वादग्रस्त फेरफार नोंद नं. ९२६६३ वर मंडळ अधिकारी नाशिक यांनी दिलेल्या निकाल पत्रानुसार सर्वे नं. ९०३/१/५ प्लॉट नं. २९ या मिळकतीकरीता खाता दुरुस्ती होण्यापूर्वीचा तसेच खाता दुरुस्तीमध्ये झालेल्या बदला नंतरचा अश्या दोन्ही ही खाता उताऱ्याची म्हणजेच ८-अ ची हस्तलिखित अथवा संगणीकृत किंवा आपल्या कार्यालयात उपलब्ध असेल त्या स्वरुपातील माहिती मिळण्याची विनंती केली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना १७/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये संगणकीकृत ७/१२ उताऱ्यामध्ये एकदा दुरुस्ती केल्यानंतर दुरुस्ती केला अगोदरचा ७/१२ उतारा संगणकामध्ये दिसुन

येत नाही. त्यामुळे दुरुस्ती पुर्वीचा ७/१२ किंवा ८-अ उपलब्ध करुन देता येत नाही याबाबत आपणास खात्री करावयाची असल्यास कार्यालयात उपस्थित राहुन माहितीचे अवलोकन करुन घेण्याबाबत कळविले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी दि. २६/११/२०२१ च्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन दि. १०/१२/२०२१ रोजी, निर्णय पारित करुन जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य ठरवून प्रथम अपिल निकाली काढले.

सुनावणीवेळी विद्यमान/तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी ७/१२ उत्ताऱ्याची माहिती मागितली असुन सदर ७/१२ हा दुसऱ्या व्यक्तीचा असल्याने माहिती पुरविता आली नसुन त्याबाबत खात्री करुन घेण्याबाबत अपिलार्थीस माहितीचे अवलोकन करण्याची संधी दिली होती. तसेच अपिलार्थी यांनी सांगितले की, सर्वे नं. ९०३/१/५ प्लॉट नं. २९ वर नोंद नं. ९२६६३ नुसार अपिलार्थी यांचे वडील कै. सुधन गोविंदराव लाड यांचे नांवाची तसेच नोंद नं. ९९५४० नुसार अपिलार्थी यांचे स्वत:चे नावाची महसूल कायद्याने नोंद झालेली असल्याने वादग्रस्त फेरफार नोंद नं. ९२६६३ प्रमाणित होण्यापूर्वीचा खाता उतारा म्हणजेच ८-अ ची माहिती मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक २५/१०/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत कार्यालयातील उपलब्ध माहिती तसेच वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे स्पष्ट होते. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही. तरी अपिलार्थी यांचे समाधान न झाल्याने विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहिती अवलोकनाची संधी देवून पुरविणे योग्य होईल.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी नाशिक शहर, नाशिक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २५/१०/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीसंदर्भात नोंदणीकृत पोचदेय डाकेने पत्र पाठवून उपलब्ध कागदपत्रांच्या समक्ष अवलोकनासाठी १५ दिवसांच्या आतील तारीख व वेळ कळवावी. अवलोकनानंतर अपिलार्थीस त्यातील कागदपत्रांच्या काही प्रती हव्या असल्यास तशी यादी घेऊन माहिती विनामूल्य व्यक्तीश: पुरवावी. तसेच माहिती उपलब्ध नसल्यास त्याबाबत स्पष्ट कारण देखील कळविण्यात यावे.

२) वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ३२८/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

१) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, ता.जि. नाशिक.

यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

**क्रमांक : रामाआ- नाशिक/द्वि.अ.क्र./३२८/२०२२/नाशिक ओ-** 2234 **दिनांक-** १८/१०/2022

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक